# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ४३) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. – ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.०३ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## 'सरकारची परिस्थिती म्हणजे दोन बायका आणि फजिती ऐका': एकनाथ खडसेंचे टीकास्त्र

जळगाव दि.२ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांनी पुन्हा एकदा शिंदे-फडणवीस-पवार सरकारवर जोरदार टीका केली आहे. हे तीन रंगाचे सरकार आहे. या सरकारची परिस्थिती म्हणजे दोन बायका आणि फजिती ऐका, असा हल्लाबोल खडसे यांनी केली आहे. एकनाथ खडसे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे की, राज्यात कायदा सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती आहे. चोरी, दरोड्यांसह इतर गुन्हेदेखील वाढत आहेत. या सरकारमध्ये काय चाललंय? हे तीन रंगाचे हे सरकार आहे. या सरकारची परिस्थिती म्हणजे दोन बायका आणि फजिती ऐका अशी आहे, असे म्हणत एकनाथ खडसे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यावर यांच्यावर निशाणा साधला. ते पुढे म्हणाले की, कुणाकुणाचे काय भाग्य फुलते. रिक्षावाला मुख्यमंत्री होतो तर टपरीवाला मंत्री होतो. मुक्ताईनगरचे आमदार ५० कोटी घेऊन ओके होतात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस, मंत्री गुलाबराव पाटील, मुक्ताईनगरचे शिंदे गटाचे आमदार चंद्रकांत पाटील सर्वांवर त्यांनी टीका केली.सरकारमधील बेरोजगारी कमी झाली. मात्र,राज्यातील बेरोजगारांची संख्या वाढली, असेही एकनाथ खडसे यावेळी म्हणाले.

## 'इंडिया' आघाडी आता शिल्लक राहीलेली नाही-प्रकाश आंबेडकर

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- इंडिया आघाडी आता शिल्लक राहिलेली नाही म्हणत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीलाही एक प्रकारे आरसा दाखवला. विशेष म्हणजे यावेळी काँग्रेसचे नाना पटोले आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे संजय राऊत उपस्थित होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, इंडिया आघाडीचे शेवटचे मजबूत पार्टनर अखिलेश यादव सुद्धा बाहेर पडलेत. ममता बॅनर्जी आणि आम आदमी पक्ष सुद्धा बाहेर पडला आहे. या आघाडीमध्ये आम्ही ताक सुद्धा फुंकून पिऊ, हे सांगायलाही ते विसरले नाहीत. यानंतर बोलताना संजय राऊत यांनी महाविकास आघाडीत सर्व काही ठीक असल्याचे सांगत सारवासारव केली.



महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (ठाकरे गट) व वंचित बहुजन आघाडी या घटकपक्षांची शुक्रवारी मुंबईतील ट्रायडन्ट हॉटेलात बैठक झाली. या बैठकीला वंचितच्या प्रकाश आंबेडकरांसह इतर तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते. या नेत्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपशी दोनहात करण्याची रणनीती निश्चित केली. तसेच काही झाले तरी मविआ फूटू न देण्याचा चंग बांधला. प्रकाश आंबेडकर काही कामानिमित्त बाहेर जाण्यासाठी ही बैठक अर्धवट सोडून बाहेर पडले.

### काही ठिकाणी रणनीती म्हणून आघाडीतील पक्ष वेगळे लढणार -संजय राऊत

शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी आंबेडकरांचा हा दावा फेटाळून लावला आहे. काही ठिकाणी रणनीती म्हणून आघाडीतील पक्ष वेगळे लढणार असल्याचे राऊत यांनी म्हटले. प्रकाश आंबेडकरांसोबत झालेल्या आजच्या बैठकीत भाजपाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत होईल, असा कोणताही निर्णय घ्यायचा नाही यावर एकमत झाले असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले.

संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, भाजपाला फायदा होईल, असे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाऊल उचलणार नाही यावर एकमत झाले आहे. भाजपचा पराभव करणे हे एकमेव लक्ष्य आहे.देशातील वातावरण बदलण्सासाठी एकत्र राहणार.भाजपाचा पराभव करणे ही आमची प्राथमिकता असल्याचे सांगत आघाडीत कोणतेही मतभेद नसल्याचे राऊत यांनी म्हटले. इंडिया आघाडीतील काही घटक पक्षांमध्ये जागा वाटपावरून काही मुद्दे आहेत. पण इंडिया आघाडी फुटली नाही. काही रणनीतीनुसार निर्णय होत आहेत. त्यानुसार, पंजाब आणि बंगालमध्ये तसे निर्णय घेतले गेले आहेत. दिल्लीत काँग्रेस आणि आपमध्ये जागा वाटप होणार असून पंजाबमध्ये स्वतंत्रपणे लढणार आहेत. ममता बॅनर्जी या देखील भाजपच्या पराभवासाठी कार्यरत असणार असल्याचे राऊत यांनी म्हटले.

त्यांना सोडण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत बाहेर आले होते.

महाविकास आघाडीची गत आम्ही इंडिया आघाडीसारखी होऊ देणार नाही. आमच्यात काही मुद्यांवर एकमत झाले नाही तरी आम्ही आपल्या वाटा वेगळ्या वाटा करायच्या नाही असा निर्धार केला आहे, अशा शब्दांत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मविआच्या येथील बैठकीनंतर बोलताना सांगितले.

पत्रकारांशी संवाद साधताना प्रकाश आंबेडकरांनी कोणत्याही स्थितीत मविआची गत इंडियासारखी होऊ न देण्याचा निर्धार व्यक्त केला. वंचित बहुजन आघाडीने दोन्ही काँग्रेस व शिवसेनेपुढे ठेवलेल्या मुद्यांवर या बैठकीत सखोल चर्चा झाली. त्यात इतरही काही मुद्यांची भर घालण्यात आली. त्यावर आजच्या बैठकीत चर्चा झाली. ही चर्चा यापुढेही सुरू राहील, असे ते म्हणाले.

## सध्याचे राजकारण भाजपला परवडणारे नाही-राज ठाकरे

### तुमच्या मनासारखे घडले मग उपोषण कशाला?; मनोज जरांगेंना सवाल

नाशिक दि.२ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी सरकारकडे केलेल्या मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. तरी देखील मनोज जरांगे यांनी उपोषण सुरू राहणार असे म्हटले आहे. त्यावर आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनोज जरांगे यांना सवाल केला आहे. तुमच्या मनासारखे घडले मग उपोषण कशाला असे मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

दरम्यान राज ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, २०१४ साली मी पंतप्रधान मोदींना पाठिंबा दिला नव्हता. त्यांच्यासारखा व्यक्ती पंतप्रधानपदावर असावा, अशी



फक्त इच्छा व्यक्त केली होती. यावेळी तसा काही विचार केलेला नाही. पंतप्रधानपदी कोण असावा? याची चाचपणी सुरू आहे. माझी चाचपणी झाली की सांगेन.

देशात सुरु असलेले अशा प्रकारचे राजकारण भविष्यात भाजपला देखील परवडणार नाही. कारण सत्तेचा अमरपट्टा कुणीही घेऊन आलेले नाही. उद्या सत्ता गेली तर काय होईल याचा विचार सत्ताधाऱ्यांनी करायला पाहिजे. इंदिरा गांधींचा दाखला देत तुम्ही हे असे किती दिवस करणार, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.राज्यात आणि देशात विरोधी पक्षांच्या नेत्यांना केंदीय तपास यंत्रणा ईडीकडून जोरदार कारवाई सुरु आहे. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना ईडीने अटक केली आहे. तर दिल्लीचे मुख्यमंत्री यांना देखील ईडीने समन्स बजावले आहे.राज्यातील अनेक बड्या नेत्यांनी ईडी चौकशी सुरु आहे. ईडीच्या या कारवाईवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी वक्तव्य केलं आहे.

## चंपाई सोरेन यांनी घेतली झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

रांची दि.२ (वृत्तसंस्था)- झारखंड मुक्ती मोर्चाचे उपाध्यक्ष चंपाई सोरेन यांनी झारखंडचे मुख्यमंत्री म्हणून आज शपथ घेतली. जमीन घोटाळ्याप्रकरणी ईडीने झारखंडचे हेमंत सोरेन यांनी अटक केली. त्यापूर्वी त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आज चंपाई सोरेन यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी शुक्रवारी चंपई सोरेन यांना पद आणि गोपनियेतेची शपथ दिली. याशिवाय काँग्रेस पक्षाचे आलमगीर आलम आणि आरजेडीचे सत्यानंद भोक्ता यांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली.

राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी यांनी चंपई सोरेन यांना बहुमत सिद्ध क?ण्यासाठी दहा दिवसांचा वेळ दिला आहे. झारखंडमध्ये काँग्रेस आणि झारखंड मुक्ती मोर्चाची युती आहे. झारखंड मोर्चाकडे सदध्या २९ तर काँग्रेसकडे १७ आमदार आहेत. त्याशिवाय आरजेडीच्या एका आमदाराचाही सपोर्ट आहे. झारखंडमधील बहुमताचा आकडा ४१ इतका आहे. त्यामुळे बहुमत सिद्ध होत नाही, तोपर्यंत आमदारांना हैदराबादमधील हॉटेलला पाठवण्यात येणार आहे.

## माझी बायको ब्राह्मण, तिच्या बहिणीला माझ्या जातीचे प्रमाणपत्र मिळणार का?; सगेसोयऱ्यांवरून जितेंद्र आव्हाडांचा राज्य सरकारला सवाल

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- ज्या मराठा बांधवांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांना कुणबी जातप्रमाणपत्र देऊन त्यांचा ओबीसी आरक्षणात समावेश केला जाणार आहे. तसेच कुणबी जातप्रमाणपत्र असलेल्या व्यक्तीच्या शपथपत्रावर त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही प्रमाणपत्र दिले जाईल, असा राज्य सरकारने अध्यादेश काढला आहे. यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सरकारला सवाल उपस्थित केला आहे. माझी बायको ब्राम्हण आहे, तर मग तिच्या बहिणीला आणि मुलांना माझ्या सगेसोयरे नातेसंबंध असल्याने त्यांनाही ओबीसी प्रमाणपत्र देणार का? असे म्हटले आहे.

राज्यभरातले अनेक ओबीसी नेते राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात आक्रमक झाले आहेत. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी राज्य सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. अशातच त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटातूनही पाठिंबा मिळू लागला आहे. शरद पवार गटातील आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भुजबळांची मागणी योग्य असल्याचं वक्तव्य केलं आहे. तसेच तुम्ही सरकारमधून बाहेर पडून तुमची मागणी लावून धरा, आम्ही तुमच्याबरोबर आहोत, असंही आव्हाड म्हणाले. आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत हे भाष्य केले.

आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण द्यावं अशी आमची मागणी आहे. परंतु, मराठा सामाजाला आरक्षण देताना ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये. ही आमची भूमिका आहे. आम्ही आज आमच्या सर्व कार्यकर्त्यांनाही तेच सांगितलं आहे. आपण सगळे बहुजन आहोत. बहुजनांमध्ये भांडणं लावून, कोंबडे झुंजवत ठेवून सत्ता लाटण्याचा प्रयत्न काही जणांकडून चालू आहे असे त्यांनी म्हटले.

मराठा आंदोलकांच्या मागण्यांबाबत राज्य सरकारने जो अध्यादेश काढला आहे, त्यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की, कुणबी प्रमाणपत्र असलेल्या लोकांच्या सगेसोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र द्या. मग माझ्या नातेवाईकांना माझी जात लागणार का? माझी बायको ब्राह्मण आहे. तिच्या बहिणीला तुम्ही वंजारी म्हणून प्रमाणपत्र देणार का? आम्ही सगेसोयरे आहोत, त्यामुळे माझ्या बायकोच्या बहिणीच्या (मेहुणी) मुलांना वंजारी जात लावणार का? आम्ही सगेसोयरे आहोत. आमचं रक्ताचं नातं आहे म्हटल्यावर त्यांना ही जात लावता आली पाहिजे असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

## पंतप्रधानांच्या हस्ते १९ फेब्रुवारीला कोस्टल रोडच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मुंबईच्या दृष्टीनं महत्त्वाच्या असणाऱ्या कोस्टल रोडच्या पहिल्या फेजचं उद्घाटन १९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कोस्टल रोडचं उद्घाटन होणार आहे. वरळी ते मरीन ड्राईव्ह या १० किलोमिटर रस्त्याचं लोकार्पण केलं जाणार आहे. तसेच, १५ मेपर्यंत दोन्ही फेज सुरू होणार असल्याची माहिती पालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी दिली आहे.

मुंबईच्या दृष्टिकोनातून महत्वकांक्षी असलेला हा प्रकल्प तितकाच खर्चिक आहे. या रोडमुळे मुंबई आणि उपनगरातील वाहतूक कोंडी कमी होणार आहे. मुंबईचा कोस्टल रोड प्रकल्प हा दोन भागात विभागला गेला आहे. दक्षिण भाग आणि उत्तर भाग असे हे दोन भाग आहेत. यामध्ये दक्षिण भागाचं काम आधी हाती घेण्यात आलं आहे. मुंबई ते कांदिवली दरम्यान जवळपास २९ किलोमीटरचा हा कोस्टल रोड प्रकल्प आहे. दक्षिण कोस्टल प्रकल्प हा साडेदहा किलोमीटरचा आहे जो मरीन ड्राईव्हच्या प्रिन्सेस स्ट्रीट फ्लाओवर पासून सुरू होतो ते वरळी वांद्रे सी-लिंकपर्यंत आहे.

## तुम्ही जिथे शिकलात तेथील मी सीनिअर प्रोफेसर; छगन भुजबळ यांचा संजय गायकवाडांना इशारा

नाशिक दि.२ (प्रतिनिधी)- गायकवाडांची भाषा योग्य नाही. पण मला त्यांना एवढेच सांगायचे की तुम्ही ज्या शिवसेनेत शिकला त्या इन्स्टिट्यूट मध्ये मी सिनियर प्रोफेसर होतो, अशा शब्दांत मंत्री छगन भुजबळ यांनी संजय गायकवाड यांना इशारा दिला आहे.

दरम्यान छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, संजय गायकवाड यांचे मी काय वाकडे केले, हेच मला कळत नाही. मी त्यांना कधी भेटलेलोही नाही. ते त्यांच्या समाजाची मागणी करत आहेत. मी माझ्या ओबीसी वर्गाची मागणी पुढे करत आहेत. यामध्ये त्यांनी वाईट वाटून घेण्याचे काही कारण नाही. कमरेत लाथ घालून मला बाहेर काढण्याची भाषा वापरली असली तरी मंत्रिमंडळातून बाहेर काढण्याचा किंवा ठेवण्याचा अधिकार सर्वस्वी मुख्यमंत्र्यांचा आहे. राहिला प्रश्न कमरेत लाथ घालण्याचा तर मला असे वाटते की ते असे करणार नाहीत. कारण त्यांचे नेते स्व. आनंद दिघे आणि त्यांचे सहकारी आमदार मो. दा. जोशी यांच्याबरोबर त्यांचा नेता म्हणून मी काम करत होतो. त्यामुळे त्यांनाही कल्पना आहे की, अशी लाथ घालणे किंवा अशाप्रकारची भाषा करणे, हे योग्य नाही.

मनोज जरांगे पाटील १० फेब्रुवारी पासून पुन्हा उपोषणाला बसणार आहेत. मराठा आंदोलकांवरील गुन्हे सरसकट मागे घ्या, अशी त्यांची मागणी आहे. या प्रश्नावर बोलत असताना छगन भुजबळ म्हणाले की, जरांगे पाटील उपोषणाला बसण्याआधीच सरकारचे जीआर तयारच असतात. त्यामुळे त्यांच्या मागण्या मान्य होऊ शकतात. शिक्षण, शेती, पायाभूत सुविधा उभारण्यावर आणि महिलांच्या प्रश्नावर ते उपोषणाला बसू शकतात, असे त्यांनी म्हटले आहे.

## ज्ञानवापीच्या तळघरात पूजा सुरू राहणार; स्थगिती देण्यास हायकोर्टाचा नकार

वाराणसी दि.२ (वृत्तसंस्था)- ज्ञानवापी व्यासांच्या तळघरात पूजा चालू राहील. मुस्लिम पक्षाच्या याचिकेवर अलाहाबाद उच्च न्यायालयाने पूजेवर बंदी घालण्याचा कोणताही आदेश दिलेला नाही. याशिवाय कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आदेशही न्यायालयाने महाधिवक्ता यांना दिले आहेत. आता याप्रकरणी पुढील सुनावणी ६ फेब्रुवारीला होणार आहे. तत्पूर्वी, गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने व्यास तळघरातील पूजा थांबवण्यासंबंधीच्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिम पक्षाला प्रथम उच्च न्यायालयात जाण्याची सूचना केली होती.

याआधी उच्च न्यायालयात दोन्ही बाजूंनी युक्तिवाद झाला. यानंतर न्यायाधीशांच्या खंडपीठाने एजीकडून वाराणसीतील परिस्थितीची माहितीही घेतली. त्याच वेळी, मुस्लिम बाजूने न्यायालयाला सांगितले की वाराणसी न्यायालयाने ७ दिवसांच्या आत तळघरात पूजा करण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, डीएमने अवघ्या ७ तासांत पूजा प्रक्रिया सुरू केली. त्यामुळे तेथे अराजकता निर्माण झाली.

## राज ठाकरे सतत कुणाचीतरी सुपारी बोलतात-मनोज जरांगे

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासंदर्भात होणाऱ्या या आंदोलनाला आतून-बाहेरून कोणाचा पाठिंबा आहे ते सर्वांना माहिती आहे. केवळ ती गोष्ट उघड बोलता येत नाही असा सवाल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपस्थित केल्यानंतर त्यांच्या या टीकेला मनोज जरांगे पाटील यांनी उत्तर दिलं आहे. मनोज जरांगे म्हणाले, हे सगळे राजकीय डाव आहेत. काही जण राजकीय सुपाऱ्या घेतल्यासारखे बोलतात. मुळात आरक्षण ठेवलेलं असतं का? कोणीतरी गेलं आणि लगेच मिळालं असं काही असतं का? हवं तर राज ठाकरे यांनी माझ्या जागी यावं, मराठ्यांचं नेतृत्व करावं. एका दिवसात आम्हाला आरक्षण मिळवून द्यावं. आम्ही तुमच्या मागे उभे राहतो.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, मुळात आरक्षणाची एक मोठी प्रक्रिया असते. तुम्हाला यात काही मिळालं नाही म्हणून तुमची पोटदुखी सुरू झाली आहे. राज ठाकरे म्हणतायत आरक्षण मिळालं नाही. त्यांचं खरं आहे त्यांना पैसे मिळाले नाहीत. त्यांना पैसे पाहिजे होते, पद पाहिजे होतं, ते मिळालं नाही. मी दुकानंच बंद केली आहेत काही लोकांची.

राज ठाकरे सतत कोणाची तरी सुपारी घेऊन बोलतात. यावेळी ते सत्ताधाऱ्यांची किंवा इतर कोणाचीतरी सुपारी घेऊन बोलत आहेत. परंतु, त्यांच्या बोलण्याने काही होणार नाही. आता सर्व मराठे एकवटले आहेत. आरक्षण घेतल्याशिवाय मराठे मागे हटणार नाहीत असे मनोज जरांगे म्हणाले.

## मनोज जरांगे यांना पोलिस सुरक्षा देण्याचा राज्य सरकारचा निर्णय

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्याबाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मनोज जरांगे यांच्या सुरक्षेसाठी आता पोलीस तैनात असणार आहे. जरांगे यांना सरकारी सुरक्षा प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आजपासून जरांगे यांच्या सुरक्षेसाठी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

राज्य गुप्त वार्ता विभागाच्या आदेशाने मनोज जरांगे यांना पोलीस सुरक्षा पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मनोज जरांगे यांच्या सुरक्षेसाठी २४ तास दोन सशस्त्र पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. दरम्यान, त्याआधी सकल मराठा समाजाकडून मुख्यमंत्र्यांकडे मनोज जरांगे यांना सुरक्षा पुरवण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आजपासून दोन कॉन्स्टेबल सुरक्षेसाठी नेमण्यात आले आहेत.

## पुढील पिढ्या हुकूमशहांच्या हातात देण्याचे पाप करू नका; उद्धव ठाकरेंचा सवाल

रायगड दि.२ (प्रतिनिधी)- पक्ष चोरणारे, फोडणारे, हिंदूंमध्ये भेदभाव करणारे तुमचे हिंदुत्व आहे का? मी हुकूमशाहीला हिंदुत्व मानणार नाही. मत तुमचे आणि किंमत त्यांना, हे चालणार नाही. तुम्हाला आता हिम्मत दाखवावी लागेल. असा घणाघात ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

दरम्यान उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघांच्या पदाधिकाऱ्यांना आवाहन करताना म्हटले की, पुढील पिढ्या हुकूमशहांच्या हातात देण्याचे पाप करू नका.

मी कालपासून इथे आहे मी काय काय केले हे गिते साहेबांनी सांगितले. कोरोना काळात मी माझ कुटुंब माझी जबाबदारीची घोषणा केली होती पण त्याने पण काहींना डोकेदुखी आहे. काहीजण दारात जातात, तेव्हा लोक म्हणतात अरे हड... असे म्हणत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी राज्य सरकारच्या शासन आपल्या दारी कार्यक्रमावर टीका केली आहे.

उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, रायगडने अनेकांना झुकवले आहे, तानाजी मालुसरे यांची ही भूमी आहे. इथे झेंडा बाजूला आणि नॅपकिन पुढे पुढे. जॅकेट घेतली पण काहीही झाले नाही भावी पालकमंत्री म्हणूनच राहिले, असे म्हणत शिंदे गटाचे नेते भरत गोगावले यांच्यावरही ठाकरेंनी जोरदार हल्लाबोल केला आहे.

## तरुण प्रलयाचे कारण ठरू शकतील!

### बेरोजगारीच्या मुद्यावरून संमेलनाध्यक्ष रवींद्र शोभणे यांचा सरकारला इशारा

अमळनेर दि.२ (प्रतिनिधी)- बेरोजगारीचा प्रश्न सध्या वाढू लागला आहे. त्यावर सरकारनेही पाठ फिरवलेली दिसतेय. प्राधापकांच्या जागा रिकाम्या असूनही त्या रिक्त जागा भरल्या जात नाहीत. बेरोजगारीच्या प्रश्नामुळे तरूण आपले जीवन संपवत आहेत. हा प्रश्न सुटायला हवा. या बेरोजगारीचं खापर कुणाच्या डोक्यावर फोडावं? असा सवाल संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी केला आहे.

एक लक्षात ठेवा, तरुणांची ऊर्जा वाहत्या पाण्यासारखी असते. ती जशी सृजनाची गंगोत्री होऊ शकते, तशी तरुणांच्या हिताचे न घडल्यास प्रलयाचे कारणही ठरू शकते, असा इशाराही शोभणे यांनी सरकारला दिला आहे. ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उदघाटन शुक्रवारी अमळनेर येथे झाले. यावेळी शोभणे अध्यक्ष पदावरून बोलत होते.

यावेळी संमेलनाध्यक्ष म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात आता आपल्याला काहीही करायचे नाही, असे ठरवून सरकारने या क्षेत्राकडे पाठ फिरवली आहे. एकीकडे प्राध्यापकांच्या जागा रिकाम्या आहेत, तर दुसरीकडे आज हजारो उच्चशिक्षित तरुण प्राध्यापकाची नोकरी मिळवण्याच्या प्रतिक्षेत म्हातारे झाले आहेत. शिक्षणाचा बाजार करणारी मंडळी शिक्षण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी बसली आहे. हे खूप धोकादायक आहे. तरुणाईचा तुम्ही किती अंत पाहणार आहात. असा खडा सवालही शोभणे यांनी केला.

# विकासकामे अन् कागदावरच्या शासकीय योजना

रस्ते, पाणी, वीज या पूर्वीपासून मूलभूत गरजा म्हणूनच त्यांची पूर्तता करणे ही शासनकर्त्यांची जबाबदारीच असते. पूर्वी कोकणातील गावो-गावी विजेची समस्या होती. अगदी अलीकडच्या काळापर्यंत अनेक भागांत वीज गेलीच नव्हती. एखाद्या ग्रामीण भागातील गावखेड्यात वर्षानुवर्षे विजेची समस्या कायम असायची. काँग्रेसी काळात तर निवडणुकांमध्ये एक गंमत असायची, काँग्रेसी पुढारी तालुक्यातील दहा-वीस गावांत वीज येणार म्हणून आश्वासित करीत असत. चार-दोन विजेचे खांबही गावात येऊन पडायचे. गावकरीही खूश व्हायचे.

आता निवडणूक झाली की, आपल्या गावात वीज येणार असे त्यांना वाटायचे; परंतु पुढच्या पंधरवड्यात त्यातलेच दोन खांब दुसऱ्या कुठल्या तरी गावात जाऊन पडलेले असायचे. अशी ही आश्वासनांची माळ गावो-गावी लावलेली असायची. आजच्या घडीला कोकणात तरी वीज आणि पाणी या समस्या सोडवण्यास बऱ्यापैकी यश आले आहे. रस्ते तर कोकणात होतच आहेत. अपवाद फक्त मुंबई-गोवा महामार्गाचाच आहे. तो देखील रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील महामार्गाचे काम आजही गती घेताना दिसत नाही. त्याची कारणे काय आहेत, ही कारणे त्यांची त्यांनाच माहीत; परंतु कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण भाग आणि रायगड जिल्ह्यातील काही भागांत रस्त्यांचे जाळे नीट विणले गेलेले नाही. या उलट सिंधुदुर्ग जिल्ह्यात रस्त्यांचा विकास झाला आहे.

रस्त्यांच्या दर्जाचा प्रश्न निश्चितच उपस्थित होऊ शकतो; परंतु गावो-गावी वाहतुकीची व्यवस्था झाली आहे. विकासकामे होण्यासाठी राजकीय, सामाजिक कार्यकर्ते अधिक जागरूक आहेत. त्याचेही एक वेगळेच रहस्य आहे. कारण कोणत्याच राजकीय पक्षांकडे कार्यकर्ते कमी आणि ठेकेदार अधिक अशी स्थिती आहे. 'ठेकेदार कम कार्यकर्ता' असा एक नवा वर्ग समाजव्यवस्थेत निर्माण झाला. पूर्वी स्वत:चे पैसे खर्च करून निष्ठेने काम करणारा कार्यकर्ता असायचा. आज कार्यकर्ता शोधावा लागेल. कार्यकर्ता शोधायला जावं तर ठेकेदार सापडणार, अशी स्थिती आहे. यामुळे कार्यकर्त्यांचे पूर्ण 'लक्ष' हे ठेकेदारीकडेच असते.

बरं कामाचा दर्जा तरी राखला गेला असता, तर बरं वाटलं असतं पण तिथेही सगळा चुना लावण्याचाच प्रकार, दर्जा नसतोच. यामुळे पावसाळा सुरू होण्यापूर्वीच रस्त्यांवर खड्ड्यांचा खो-खो सुरू होतो हे वास्तव कुणाला रूचतही नाही. यामुळे विकासकामे होत आहेत. विकासकामे होत नाहीत, असं कुणालाच म्हणता येणार नाही. त्या विकासकामांचा निश्चितच दर्जा तपासावा लागेल. तो दर्जा सुधारला तर असंख्य विकासकामे कोकणात झाल्याचे दिसून येतील. एकिकडे विकासकामे होत असली तरीही केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळा-गाळापर्यंत पोहोचतच नाहीत. अनेक शासकीय योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचलेल्या नसतात. एकतर कोकणातील जनता 'गजाली'मध्ये रमणारी असली तरीही शासकीय योजना कोणत्या आहेत, त्या योजनांचे लाभ कसे घ्यावेत, सर्वसामान्य जनतेसाठी कोणत्या योजनांचा लाभ होऊ शकतो त्यासाठी आपण काय करणे आवश्यक आहे, याची माहितीच नसते. प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ जास्तीत-जास्त लोकांना देण्यासाठी कधीही उत्सुक नसतात.

याउलट लाभार्थ्यांपर्यंत ती माहिती कशी पोहोचणार नाही, याची जणू व्यवस्थाच करण्यात आलेली असते. जेव्हा कोकणातील लोकांना काही काम-धंदा करायलाच नको, असे आपण म्हणतो तेव्हा एखाद्या योजनेचा लाभ घेण्यासाठी जर कोणी पुढाकार घेऊन प्रपोजल तयार करण्याचा प्रयत्न केला, तर शासकीय कार्यालयातून अडवणूक ही ठरलेलीच असते. यामुळे आधीच फार उत्सुक नसलेला कोकणवासीय योजनेचा लाभ घेण्याच्या फंदात पडत नाही. शासनाच्या असंख्य चांगल्या योजना आहेत. अनेक योजनातून सर्वसामान्य जनतेचे संसार फुलू शकतात. कुटुंब उभी राहू शकतात; परंतु या योजना लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. पूर्वी गावो-गावचे कार्यकर्ते या अशा योजनांची माहिती गावातील ग्रामस्थांपर्यंत पोहोचवायचे. लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करत परिपूर्ण प्रस्ताव शासकीय कार्यालयात जायचे. यामुळे शासकीय योजनांचा लाभ चांगला मिळायचा. आता शासकीय कार्यालयातील ऑनलाइन-ऑफलाइनच्या कार्यपद्धतीत सामान्य जनतेचा जीव मेटाकुटीस येतो. साधा तहसीलदार कार्यालयात कुठलेही दाखले घेण्यासाठी जो काही छळ मांडला जातो, त्यामुळे दाखला नको पण हेलपाटे नको अशी म्हणण्याची वेळ सामान्य शेतकऱ्यावर येते. 'नेटवर्क' नाही हे कारण सांगून सामान्य शेतकऱ्याला त्रास देणारे कारकून आजही शासकीय कार्यालयातून दिसतात.

एखाद्या दाखल्यासाठी पाच मिनिटांत होणार असेल तरीही दहा-पंधरा वेळा फेऱ्या मारायला लावण्यात शासकीय कार्यालयातील या रावसाहेब भाऊसाहेबांना कोणता आनंद मिळतो कुणास ठाऊक! खरंतर सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांनी शासकीय योजनांची माहिती घेऊन गावातील कोणत्या योजनेचा लाभ कोण घेऊन शकतो, याचा विचार करून लाभार्थी संख्या कशी वाढेल हे पाहिले पाहिजे. यासाठी संवेदनशील कार्यकर्ता असला पाहिजे. तरच त्यातून चांगल काही घडू शकेल. नेहमीच विकासकामे आणि शासकीय योजना यांची गल्लत केली जाते. विकासकामे ही आमदार, खासदार, मंत्री या प्रयत्नातून दूरदृष्टीतून होतच असतात; परंतु शासकीय योजनांचा फायदा जास्तीत-जास्त लोकांपर्यंत होण्यासाठी हे प्रयत्न करावे लागतील तेव्हाच शासकीय सामान्यजनतेपर्यंत पोहोचू शकतील. योजनांचा लाभ घेऊन अनेक कुटुंब आर्थिक सक्षमतेने उभी राहू शकतील.

# सर्वसमावेशक विकासावर भर देणारा अर्थसंकल्प

**आगामी** लोकसभेच्या निवडणुकांना सामोरे जाताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन या मोठ्या घोषणा करतील, असा अंदाज होता; परंतु त्या मार्गावरून न जाता तीन महिन्यांसाठीचे लेखानुदान या स्वरूपात सीतारामन यांनी या अर्थसंकल्पाकडे पाहिले. तसेच निवडणुकीचे पत्ते भाजपाच्या मनाप्रमाणे पडत आहेत. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्याचे पडसाद अंतरिम अर्थसंकल्पात उमटले आहेत. या अर्थसंकल्पात धक्कादायक घोषणा नाहीत. संतुलित राहून मुद्दे मांडत खऱ्या अर्थाने अंतरिम अर्थसंकल्प सादर केला गेला आहे. लोकसभा निवडणुकीनंतर पूर्ण अर्थसंकल्प सादर करताना विकसित भारताचा रोडमॅप दिसेल, असे स्वप्न अर्थमंत्र्यांनी दाखवले आहे. कोणी कितीही लुभावणारा अर्थसंकल्प सादर केला तरी त्यावरही काही घटक नाराज असतात. तसे आता सीतारामन यांच्यावरही काही लोक नाराज झाले आहेत.

पायाभूत क्षेत्र आणि संरक्षण क्षेत्रासाठी मोठी तरतूद करूनही त्याचे पडसाद न उमटता गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारा आणि करदात्यांना खूश करणारा अर्थसंकल्प नसल्याने बाजाराने नकारात्मकता दाखवली असली, तरी ती फार अनपेक्षित नव्हती. करेक्शन करण्याइतकीच पडझड झाली. याउलट, सरकारने ग्रीन एनर्जी, हरित गृह वायूंचे प्रमाण कमी करण्यावर दिलेला भर आणि स्टार्ट-अप उद्योगांना दिलेले प्रोत्साहन पाहता दीर्घकालीन दृष्टीने परिणामांचा विचार या अर्थसंकल्पात केला आहे. अर्थमंत्र्यांचे अर्थसंकल्पीय भाषण मुळात चार गटांवर केंद्रित होते. यामध्ये महिला, गरीब, शेतकरी आणि तरुणांचा समावेश होता. गेल्या काही वर्षांमधील हे सर्वात लहान बजेट होते. अर्थमंत्र्यांच्या ५८ मिनिटांच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्वी जाहीर केलेल्या योजनांचा समावेश केलेला दिसला.

गेल्या दहा वर्षांमध्ये महिलांसाठी कल्याणकारी योजना आणि गरिबांसाठी घरे याकडे मोदी सरकारचे लक्ष राहिले आहे. सरकारने प्रधानमंत्री आवास योजना आणि आयुष्मान भारत यांसारख्या योजनांवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. अंतरिम अर्थसंकल्पात केलेल्या काही घोषणा या योजनांशी संबंधित आहेत. पंतप्रधान आवास योजनेचे वाटप ५४ हजार १०३ लाख कोटी रुपयांवरून ८० हजार ६७१ कोटी रुपये झाले आहे. संरक्षणासाठी ११ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 'आयुष्मान भारत' योजनेची व्याप्ती वाढवताना सामजिक कल्याणाचा विचार करण्यात आला आहे. अंगणवाडी सेविका, आशा गटप्रवर्तकांना या योजनेचे फायदे मिळणार आहेत.

एकीकडे वेगवेगळ्या विभागांसाठी तरतुदी वाढवताना शिक्षणासाठी मात्र तरतूद कमी केल्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात आले. शिक्षणावर एकूण जीडीपीच्या सहा टक्के खर्च करण्याची शिफारस होऊन अनेक दशके झाली तरी माणूस घडवणाऱ्या या क्षेत्राकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. कररचनेत आणि जीएसटी दरात कोणतेही बदल न केल्यामुळे व्यापारी, मध्यमवर्ग नाराज झाला असला, तरी एक कोटी लोकांना दिलेल्या नोटिसा परत घेऊन काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला आहे. अर्थसंकल्प केवळ देशापुरताच मर्यादित नसतो. त्याचे जगावरही परिणाम होत असतात. या वेळी 'आयएमईसी' कॉरिडॉर आणि लक्षद्वीप बेटाच्या विकासाची घोषणा करून अर्थमंत्र्यांनी भारताचा जागतिक व्यापार गतिमान करण्यावर भर देतानाच चीन आणि मालदीवला थेट शह दिला आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी नव्या योजनेची घोषणा न करणे हा मोदी यांच्यावरील विश्वास दाखवतो. अनेक उपाययोजनांनी युक्त असा सरकारचा हा सार्वत्रिक निवडणुकांपूर्वीचा शेवटचा अर्थसंकल्प होता. यामध्ये केवळ भारतीय अर्थव्यवस्थेला भविष्यासाठी तयार करण्याचा हेतू नव्हता, तर सर्वसमावेशक विकासावरही भर देण्यात आला होता. पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीवर दिलेला भर आणि त्यासाठी भांडवली खर्चासाठी केलेली ३३.४ टक्के तरतूद, एकूण १० लाख कोटी रुपये खर्च करण्याची दाखवलेली तयारी स्वागतार्ह आहे. केंद्र सरकारने राज्यांना पायाभूत सुविधांची निर्मिती करता यावी यासाठी ५० वर्षे व्याजमुक्त कर्ज देण्याची घोषणाही केली आहे.

रेल्वेसाठी वाढीव २.४ लाख कोटी रुपयांचा भांडवल पुरवठा करण्यात येणार आहे. यामुळे अन्य क्षेत्रांच्या विकासाला चालना मिळणार आहे. टियर-२ व टियर-३ स्तरातील गावांमध्ये १० हजार कोटी रुपयांचा नागरी पायाभूत सुविधा विकास निधी (यूआयडीएफ) तयार करण्याचा प्रस्तावही मांडला गेला आहे. यामुळे पायाभूत सुविधांच्या विकासाचे फायदे अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांपर्यंत पोहोचवता येणार आहेत.

तरुणांना सक्षम करणे तसेच 'प्रधानमंत्री कौशल विकास योजना ४.०'सारख्या योजनांनी युवा वर्गाचे सक्षमीकरण करण्याचे ठरवले आहे. यासाठी कोडिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), रोबोटिक्स, थ्रीडी प्रिंटिंग आदी अभ्यासक्रम विकसित करण्यात येणार आहेत.

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल सन्मान पॅकेजअंतर्गत पारंपरिक कारागीर आणि हस्तकलाकार, वंचित मागास वर्ग यांच्यासाठी उपक्रम आखले जाणार आहेत. यातून मागास भागाचा आर्थिक विकास साधला जाणार आहे. केंद्राने पर्यावरणानुकूल विकासावर (ग्रीन ग्रोथ) लक्ष केंद्रित केले आहे. विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी लागणाऱ्या बॅटरींची निर्मिती करण्यासाठी आयात केल्या जाणाऱ्या यंत्रसामग्रीवरील सीमा शुल्क कमी करण्यात येणार आहे. ईव्ही वाहनांची विक्री तीस टक्क्यांवर नेण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. त्यात मुख्य अडथळा चार्जिंगचा होता. आता चार्जिंगच्या पायाभूत सुविधानिर्मितीवर सरकारने भर दिला आहे. दुसरीकडे कृषी क्षेत्राचा विकासदर चार टक्क्यांवरून घसरून १.८ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राला सावरण्यासाठी ठोस उपाययोजना केलेल्या दिसत आहेत.

**- महेश देशपांडे, आर्थिक घडामोडींचे अभ्यासक**

# राज्यातील पदवीधर शिक्षकांना न्यायालयाचा मोठा दिलासा ; जेष्ठता २४ मार्च २०२३च्या राजपत्रानुसारच

अलिबाग, दि. २ (प्रतिनिधी) - मुंबई उच्च न्यायालयाच्या द्वीखंडपीठाच्या निर्देशानुसार आता पदवीधर शिक्षकांची सेवाजेष्ठता ही २४ मार्च २०२३ च्या राजपत्रानुसारच ठरणार आहे. त्यामुळे आता पदवीधर शिक्षकांचा सेवाजेष्ठतेचा तिढा सुटल्याने राज्य पदविधर डीएड कला क्रीडाशिक्षक संघाने आनंद व्यक्त केला.

मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिका क्रमांक ११२४३/२०२३च्या निमित्ताने मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश नितीन जामदार आणि न्यायधीश एम.एम. साठ्ये यांनी राजपत्राबाबत गुरुवारी (दि.१८) माध्यमिक शिक्षकांच्या सेवा जेष्ठतेबाबत महत्त्वपूर्ण अंतरिम निर्देश दिले आहेत. या निर्णयाबद्दल पदवीधर डीएड कला, क्रीडा शिक्षक संघाने जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रानुसार न्यायालयाने असे स्पष्ट केले आहे की, राजपत्र (अधिसुचना) २४ मार्च २०२३ नुसारच माध्यमिक शिक्षकांच्या सेवाजेष्ठता याद्या तयार कराव्यात आणि त्यानुसारच पदोन्नती प्रक्रिया राबवावी. तत्पूर्वी याचिका क्रमांक ११२२४३/२०२३ च्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ७ सप्टेंबर २०२३ रोजी निर्देश दिले गेले होते की, सदर निर्देश याचिकाकर्त्या ठाणे जिल्ह्यातील वाशिंदच्या सरस्वती विद्यालयीतील मीना अशोक कांबळे आणि प्रतिवादी सचिव, विद्या विकास मंडळ वाशिंद जिल्हा ठाणे यांच्याशीच संबंधित असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. याचिका क्रमांक ११२४३/२०२३ च्या अनुषंगाने न्यायालयाने दिनांक ७ सप्टेंबर २०२३ रोजी दिलेल्या निर्देशाचा गैरअर्थ काढत संस्थाचालकांनी जेष्ठता याद्या बदलल्या. राजपत्रानुसार बनविलेल्या जेष्ठता यादींकडे दुर्लक्ष केले.

जाणीवपूर्वक बी.एड. ही व्यवसाय पात्रता पूर्ण केलेल्या तारखेनुसार सेवाजेष्ठता याद्या तयार केल्या. राजपत्रातील दुरुस्तीनुसार नसलेले पदोन्नती प्रस्ताव शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक (माध्यमिक) कार्यालयाकडे दाखल करण्यात आले. अशा चुकीच्या पद्धतीने पदोन्नती प्रस्तावांना मान्यता देण्यात आल्या आहेत. त्यामुळे राजपत्रानुसार सेवाजेष्ठता असलेल्या शिक्षकांवर अन्याय झालेला आहे. कायद्याचा सरळ-सरळ भंग झालेला आहे अशी भूमिका हस्तक्षेप याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील राम आपटे, वकील यतीन मालवणकर, वकील जे.एच. ओक यांनी प्रभावीपणे मांडली. मांडलेल्या न्यायसंघ स्पष्टीकरणामुळे न्यायालयाने स्पष्ट केले की, दिनांक ७ सप्टेंबर २०२३ नंतर चुकीच्या पद्धतीने अर्थात राजपत्राच्या आदेशानुसार जेष्ठता डावलून दिल्या गेलेल्या मान्यता आता न्यायालयीन निर्णयाच्या आधीन राहणार आहेत. साहजिकच अशा चुकीच्या पदोन्नतीचे भवितव्य न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर अवलंबून राहणार आहे. राजपत्रानुसार डीएड (दोन वर्षाचा जुना पाठ्यक्रम) शिक्षक हा पदवी प्राप्त तारखेपासून प्रवर्ग क मध्ये समाविष्ट होतो. ही बाब शिक्षणाधिकारी/ शिक्षक निरीक्षकांनी यापुढे गांभीर्याने घ्यावी. राजपत्रानुसार असलेली जेष्ठता डावलून पदोन्नती प्रस्तावांना मान्यता दिल्या गेल्या, तर तो कायद्याचा आणि न्यायालयीन निर्देशाचा अवमान ठरणार आहे. शिक्षणाधिकारी किंवा शिक्षण निरीक्षक यांनी न्यायसंगत भूमिका घ्यावी असे आवाहन पदवीधर डीएड कला क्रीडा शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप आवारे व सचिव महादेव माने यांनी केले आहे.

मागील अनेक वर्षे आम्ही या मागणीसाठी लढा देत होतो. न्यायालयाच्या या निर्णयामुळे सर्व डीएड पदवीधर शिक्षकांना दिलासा मिळाला असून, पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाला आहे, असे डीएड पदवीधर संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष महादेव साबळे यांनी सांगितले.

# ९७ व्या साहित्य संमेलनाच्या ग्रंथदिंडीस शंखनाद, टाळमृदंग, ढोलताशांच्या गजरात प्रारंभ

जळगाव, दि. २ (प्रतिनिधी) - शंखनाद, टाळमृदंग अन् ढोलताशांच्या गजरात ग्रंथांचे पूजन करून ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची ग्रंथदिंडीने सुरुवात झाली.

ग्रंथदिंडीस महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे, संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. रवींद्र शोभणे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, निमंत्रक तथा मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, अमळनेरच्या मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, माजी आमदार स्मिता वाघ, जैन उद्योग समुहाचे अध्यक्ष अशोक जैन यांच्यासह मराठी साहित्य महामंडळ व मराठी वाङ्मय मंडळाचे सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत श्री संत सद्गुरू सखाराम महाराज विठ्ठल संस्थान (वाडी संस्थान) येथून मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. ग्रंथदिंडीच्या पालखीत दासबोध, श्री ज्ञानेश्वरी, भारताचे संविधान, श्रीमद् भगवतगीता, भारतीय संस्कृती या ग्रंथ गुरूंचा समावेश होता.

सकाळी ८ वाजता ग्रंथदिंडीने साहित्य संमेलनाची सुरवात होणार असल्याने अमळनेर शहरातील विविध शाळांचे विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी याच्यासह सुमारे ४ हजार सारस्वतांच्या गर्दीने अमळनेर शहर फुलले होते. दिंडी जसजशी पुढे -पुढे जात होती तसतसा अमळनेरकरांकडून दिंडीवर पुष्पवर्षाव होत होता. यामुळे मराठी सारस्वतांचा उत्साह अधिकच द्विगुनीत होत होता.

ग्रंथदिंडी सराफ बाजार, दगडी दरवाजा, राणी लक्ष्मीबाई चौक, सुभाष चौक, स्टेट बॅंक, पोस्ट ऑफिस, नाट्यगृह, उड्डाणपूल या मार्गाने येत असताना चौकात विविध ठिकाणी रांगोळी काढून ग्रंथांसह सारस्वतांचे स्वागत केले. सकाळी ८ वाजता सुरू झालेली दिंडी संमेलनस्थळी १० वाजता पोहचली. मंत्री गिरीष महाजन, जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, केशव स्मृती सेवा संस्था समूहाचे अध्यक्ष डॉ. भरत अमळकर यांनीही या दिंडीत सहभाग घेत पायी चालले, तर मंत्री श्री. महाजन यांनी दिंडी मार्गावरील विविध थोर महापुरूषांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करून अभिवादन केले.

या संस्थाचा होता सहभाग

केशव शंखनाद पथक, पुणे, खान्देश शिक्षण मंडळ संचालित प्रताप महाविद्यालय, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्रचार्य, सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी, एनएसएस, एनसीसी, वसतीगृह विद्यार्थ्यांसह सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, ढोल ताशा पथक, गंगाराम सखाराम शाळा अमळनेर, द्रो. रा. कन्या शाळा, अमळनेर, प्रताप हायस्कूल, अमळनेर, मंगळग्रह संस्थान ग्रंथ पालखी, स्वामी विवेकानंद शाळा, बंजारा समाज पारंपरिक नृत्य चाळीसगाव, धनगर समाज पारंपारिक नृत्य, वासुदेव पथक जामनेर, नवलभाऊ प्रतिष्ठान आर्मी स्कूल, सावित्रीबाई फुले शाळा अमळनेर, साने गुरूजी शाळा, नगर परिषदेचे सर्व कर्मचारी, मराठी वाङ्मय मंडळाचे सर्व समिती सदस्य, वारकरी पाठशाळा अमळनेर, नंदगाव माध्यमिक विद्यालय, भरवस माध्यमिक विद्यालय, महसुल व पोलीस प्रशासन, फार्मसी महाविद्यालय, एसएनडीटी कॉलेज, एमएसडब्लू कॉलेज, टाकरखेडा माध्यमिक हायस्कूल, उदय माध्यमिक विद्यालय, चौबारी माध्यमिक विद्यालय, रणाईचा माध्यमिक आश्रमशाळा, हातेड माध्यमिक शाळा, कोळपिंप्री माध्यमिक विद्यालय, शारदा माध्यमिक शाळा कळमसरे, पी. एन. मुंदडा माध्यमिक शाळा, इंदिरा गांधी माध्यमिक शाळा, गडखांब माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ग्रंथदिंडीत सहभागी झाले होते.

# १२ गड किल्ल्यांचा युनेस्कोकडे नामांकनाचा प्रस्ताव स्वागतार्ह; सोबतच सरकारने राज्यातील लहान-मोठे ३९० गडकिल्ले सुशोभित करण्यास प्रथम प्राधान्य द्यावे

महाराष्ट्रातील शिववैभव संपूर्ण जगातील कानाकोपऱ्यात गेलेच पाहिजे.त्याच अनुषंगाने १२ गडकिल्ले युनेस्कोकडे नामांकनासाठी सरकारने पाठविले आहेत.यामुळे महाराष्ट्राचाच नाही तर संपूर्ण भारताचा गौरव वाढेल व संपूर्ण जगात शिवाजी महाराजांची गौरवगाथा आपल्याला दिसुन येईल.या किल्ल्यांना असलेले शौर्य,पराक्रम, रयतेच्या कल्याणाचा वारसा आणि ऐतिहासिक महत्वकांशा भारतासह जगभरात पहायला मिळेल. महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला असे १२ गड किल्ल्यांना म्हणजेच मराठा मिलिटरी लॅंडस्केप्स ऑफ इंडियाला जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यासाठी भारत सरकारने युनेस्कोकडे प्रस्ताव सादर केला आहे.केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने २०२४-२०२५ या वर्षासाठी शिवरायांच्या या गडकिल्ल्यांना नामांकन देण्याचा प्रस्ताव पाठविला आहे.यामुळे महाराष्ट्रातील व तामिळनाडूतील जिंजी किल्ला आंतरराष्ट्रीय पातळीवर गणल्या जाईल व पर्यटनाला चालना मिळण्यास मोठी मदत होईल.परंतु एकट्या महाराष्ट्रात शिवकालीन ३९० हुन अधिक गडकिल्ले आहेत.त्यांचाही युद्धपातळीवर विकास व्हायला पाहिजे यापध्दतीने सरकारने पाऊल उचलले पाहिजे.कारण यामुळे शिवकालीन वास्तु टिकण्यास मोठी मदत होईलच सोबत राज्यासह देशातील प्रत्येक व्यक्ती शिवकालीन लहान-मोठे गडकिल्ले पहाने पसंत करेल व इतिहास पुन्हा-पुन्हा जागृत होईल.

आज भारत जगात तिसरी महाशक्ती म्हणून उदयास येत आहे.त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने व ऐतिहासिक वास्तू जोपासण्यासाठी संपूर्ण लहान-मोठ्या गड किल्ल्यांना सरकारने प्राधान्य द्यायला हवे.कारण राज्यातील अनेक गडकिल्ले जिर्णाअवस्थेत आहे.परंतु शिवरायांच्या आठवणी जागृत ठेवण्यासाठी त्याचा जिर्णोद्धार होणे गरजेचे आहे. युनेस्कोकडे पाठविलेल्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्रातील साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या ११ आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ल्यांचा समावेश आहे ही महाराष्ट्रवासीयांसाठी आणि भारतासाठी स्वागतार्ह व गौरवास्पद बाब आहे.

आपण गडकिल्ल्यांकडे पाहाले व त्याचा निरखून अभ्यास केला तर आपल्याला त्या किल्ल्याची बनावट व शौर्यगाथा,पराक्रम पाहून मन भारावून जाते अशा पध्दतीची गडकिल्ल्यांची बनावट व जोपासना त्याकाळी कशीकाय केली असावी हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल.महत्वाचे म्हणजे ज्या १२ किल्याचा युनेस्कोकडे नामांकनासाठी प्रस्ताव पाठविला आहे ते गडकिल्ले मराठा राजवटीत शत्रूशी झुंज देण्यासाठी लष्करी तळासाठी वापर केला जात असे.त्या किल्ल्यांना आता युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात स्थान मिळण्यासाठी भारताकडून नामांकनाचा प्रस्ताव सादर केला आहे.कारण १७ व्या शतकापासून तर १८१८ पर्यंत पेशवे राजवटीत असलेले किल्ले सांस्कृतिक आणि नैसर्गिक अशा दोन श्रेणींमध्ये विभागले गेले आहे.मराठा शासन काळात या किल्ल्यांचा वापर करून अतुलनीय पराक्रम गाजविला होता.सह्यांद्री, कोकण किनारपट्टी आणि दख्खनच्या पठारावर असलेल्या या किल्ल्यांचे भौगोलिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचे नामांकन सांस्कृतिक आणि नैसर्गिक अशा दोन श्रेणीत होत असते आणि या दोन्ही श्रेणी १२ गडकिल्ल्यांमध्ये आजही शाबूत आहे.त्यामुळे भारताच्या १२ ही गडकिल्ल्यांचा युनेस्कोच्या यादीत समावेश अवश्य होईल असा माझा ठाम विश्वास आहे.यामुळे भारताची वैभवगाथा जगप्रसिद्ध होईल व जागतिक पर्यटन स्थळे म्हणून जगातील पर्यटक किल्ल्यांना भेट देतील यामुळे भारत आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल.

१२ गडकिल्ले जागतिक स्तरावर यावे यासाठी युनेस्कोकडे नामांकन केले हे तर खुपच छान आणि स्वागतार्ह आहे.परंतु महाराष्ट्रासह भारतीयांसाठी महाराष्ट्रातील लहान-मोठे ३९० हुन अधिक गडकिल्ले आहेत ते सुशोभित करण्याकडे सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे. यामुळे महाराष्ट्राला आर्थिक बळ मिळेल व राज्याचा विकास भरभराटीला येईल.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)

# वैजापूर पोलीस स्टेशनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती पूर्व शांतता समिती बैठक



वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) - हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तारखेप्रमाणे जयंती सोमवार (ता.१९) रोजी येत आहे.

या जयंती च्या पार्श्वभूमीवर शुक्रवार(ता.०२) वैजापूर पोलीस स्टेशन मध्ये आय.पी.एस. सहायक पोलिस अधिक्षिका महक स्वामी यांच्या उपस्थितीत शांतता समिती विविध सांस्कृतिक मंडळे, विविध पक्षांचे पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली,महक स्वामी यांनी उत्सव समिती सदस्य यांना जयंती निमित्त काय कार्यक्रम आयोजित करणार या विषयी माहिती, तसेच वाद्य कोणते लावणार या विषयी माहिती पोलिस स्टेशनला द्यावी अशी सूचना करून, डीजे टाळावा असे आवाहन केले. या सहायक पोलिस निरीक्षक विजय देशमुख यांनी ही मार्गदर्शन केले. मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत बिघोत राजपूत यांनी ही न.प. प्रशासन सर्व प्रकारचे सहकार्य करेल असे सांगितले. प्रास्ताविक व सूत्र संचलन जेष्ठ नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यानी केले. याप्रसंगी हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानच्या वतीने शिवसेना शहरप्रमुख पारस घाटे, भाजपा शहर अध्यक्ष दिनेश राजपूत यांनी जागेवरच छत्रपती शिव जयंती साजरी करून विविध सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्यक्रम घेणार असल्याचे वक्तव्य केले. शिवसेना तालुकाप्रमुख सचिन उर्फ बंडू वाणी यांची ही प्रमुख उपस्थिती होती. नगरसेवक डॉ. निलेश भाटिया यांनी ही सूचना केल्या. महिलांमध्ये मंजुषा ढाकरे यांनी ही मत व्यक्त केले. या प्रसंगी संजय बोरनारे, रणजित चव्हाण, श्री वाघ, माजी नगरसेवक राजुसिह राजपूत, गणेश खैरे, सखाहरी बर्डे, सुरेश तांबे हाजी इम्रान कुरेशी, काझी हाफीजोद्दीन, शकील कुरेशी, गौरव दौडे, महिला आघाडीच्या सुलभाताई भोपळे, सुप्रिया व्यवहारे, ज्योती हंगे, पुनम पठारे, निशा गोरक्ष, श्रीमती कदम, गौरव धामणे, संतोष गायकवाड, किशोर आहिरे, रामचंद्र पिलदे, निलेश पारख,रवी पगारे यांच्याशिवाय समितीचे सदस्य उपस्थित होते. शेवटी पो.कॉ. मेटे यांनी आभार मानले.

# श्रीरामांसाठी भक्तगण करतायत भरभरून दान, दिवसातून दोनदा रिकामी करावी लागते दानपेटी

मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) - राम मंदिराच्या प्राण प्रतिष्ठेला ११ दिवस झाले आहेत. अभिषेक समारंभानंतर साधारण २५ लाख भक्त आतापर्यंत राम जन्मभूमीमध्ये दर्शन घेऊन झाले आहेत. राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्राने दिलेल्या माहितीनुसार गेल्या १० दिवसांत दान पेटींमध्ये तब्बल ८ कोटी रूपये जमा झाले आहे आणि साधारण ३.५० कोटी लोकांनी ऑनलाईन पद्धतीने दान दिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार गर्भगृह जिथे देव विराजमान आहे त्यांच्यासमोर दर्शन पथाजवळ चार मोठ्या आकाराच्या दान पेटी ठेवण्यात आल्या आहेत. यात भक्तगण दान करत आहेत. याशिवाय १० संगणकीकृत काऊंटरवरही लोक दान करत आहेत.

सर्व दान काऊंटरवरवर मंदिर ट्रस्टचे कर्मचारी नियुक्त क?ण्यात आले आहेत. संध्याकाळी काऊंटर बंद झाल्यानंतर मिळालेली रक्कम ही ट्रस्ट कार्यालयात जमा केली जाते. १४ कर्मचाऱ्यांची एक टीम चार दान पेटींमध्ये आलेल्या दानाची गणना करते. यात ११ बँक कर्मचारी आणि तीन मंदिर ट्रस्टचे कर्मचारी सामील आहे.

दान राशी जमा करण्यासोबतच ते त्याच्या गणनेपर्यंत सर्व काही प्रक्रिया ही सीसीटीव्हीच्या निगराणीखाली केली जाते. भक्तांना श्रीरामांचो दर्शनपथावर बिजोलिया दगड लावले आहेत.

तज्ञांनी दावा केला आहे की साधारण ५ लाख स्क्वे फूट वर्गात या बिजोलिया दगडांवर भक्तगण प्रत्येक मोसमात आरामात चालू शकतात. श्रीरामांच्या दर्शनासाठी दरदिवसाला २ लाखाहून अधिक भक्तगण येत आहेत. गेल्या ११ दिवसांत राम मंदिरात दर्शनासाठी तब्बल २५ लाखाहून अधिक भक्त येऊन गेले आहेत.

# श्री. संभवनाथ दिगंबर जैन मंदिराच्या वर्धापन दिवसानिमीत्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - श्री.१००८ संभवनाथ दिगंबर जैन मंदिर बजाजनगर पंढरपुर मंदिराच्या १२ व्या वर्धापन दिवसा निमित्त दिनांक ४ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यकमांचे आयोजन करण्यात आले आहे. प.पु. आचार्य हेमसागरजी महाराज व आचार्य सुविसागरजी महाराज यांच्या मंगल प्रेरणा व आर्शिवादाने हा कार्यकम आयोजीत करण्यात आला आहे. सर्व प्रथम सकाळी ७ वाजता भव्य शोभायात्रा, सकाळी ८ वाजता कल्याणमल संदीप, योगेश कासलीवाल परिवार आडुळवाला यांच्या वतीने धर्मध्वजारोहन होउन कार्यकमाची सुरुवत रण्यात येणार आहे. तदनंतर ८.३० वाजता भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येणार आहे. यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचा मान योगीता महावीर पांडे यांना मिळाला आहे. तर इंद्र म्हणुन डॉ. वंदना राजेंद्र काला, प्रिती सुजीत गोधा, सोनल सचिन पाटणी, पुजा अतुल चुडीवाल, सपना सुदेश अजमेरा, समता तुषार साहुजी यांना मिळाला आहे. कार्यकमासाठी प्रमुख अतिथी म्हणुन केद्रीय अर्थमंत्री भागवत कराड, आ.अतुल सावे, आ.संजय शिरसाठ, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, जिल्हा सरचिटणीस अनिल चोरडिया, सरपंच सुनिल काळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच दुपारी २ वाजता संगीतमय भक्तांबर विधान व संध्याकाळी ७ वाजता संगीतमय महाआरती व भजनसंध्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित भाविकांना अनिता महावीर संकेत कासलीवाल परिवार खराडीवाला व संतोष मनोज स्वप्नील अक्षद कासलीवाल परिवार बजाजनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे. तरी समाज बांधवांनी वरील कार्यकमास मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष डॉ.राजेंद्र काला, सचिव सुचित गोधा,उपाध्यक्ष अतुल चुडीवाल,कोषाध्यक्ष सुदेश अजमेरा, सदस्य दिपक काला, महावीर पांडे, सचिन पाटणी, योगेश कासलीवाल, सुनिल पांडे, जीवन गंगवाल, सल्लागार डॉ. सुरेश बडजाते, रविंद्र ठोले संदीप बाकलीवाल सकल जैन समाज बजाजनगर पंढरपूर, वाळुज, सिडको महानगर १ यांनी केले आहे.

# संस्कार शिदोरी ( बाल कविता संग्रह )

वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) - येथील सत्तरीत असलेल्या शुभदा चव्हाण यांचा पहिला १०१ कवितांचा बालकाव्य संग्रह'संस्कार शिदोरी' नुकताच प्रकाशित झालेला आहे. बाल मनाचा सखोल अभ्यास करून व त्यांच्या भावविश्वात रमून श्रीमती शुभदा चव्हाण यांनी या १०१ कविता लिहिल्याचे दिसून येते.

बालमनाशी व किशोर वयीन मुलां-मुलींच्या मनाशी एकरूप होऊन या कविता साकार झाल्याचे दिसते. आज सामाजिक, कौटुंबिक, शालेय व शैक्षणिक स्थिती कमालीची बदलत आहे, वरील विषयाना आणखी क्षती पोहचू नये, त्यांचे महत्व तसेच टिकून रहावे म्हणून आई, आजी-आजोबा, जिव्हाळा, घराचे घरपण, संस्कार, माझी माय, गुरुचे महत्व, माझे आई-बाबा असे विषय घेऊन अत्यंत सोप्या भाषेत काव्य रचना करून संस्कार बाल मनावर बिंबविण्याचा केलेला प्रयत्न वाखाणण्यासारखा आहे.

**संस्कार या**
**कवितेतील चार ओळी**
**जिथे संस्कारांची**
**होते पहाट तेथे**
**पुढील जीवनाची**
**दिसते सुंदर पहाट**

ह्या ओळी बऱ्याच बोलक्या आहेत. संस्कार आरंभ कुटुंबातून होतो व हे संस्कारच उज्वल भविष्याचे पाया भरणी करतात असे कवयित्री ला सुचवायचे आहे.

आजी-आजोबा या कवितेत कवियत्री म्हणते आजी -आजोबा किती महान आपल्या घराची आहेत शान आजी -आजोबा द्वारे होणारे संस्कार आज लोप पावत आहेत.

आजी आजोबांचे घरातील महत्वपूर्ण स्थान दाखविण्याचा हा प्रयत्न महान आहे. शुभदा चव्हाण यांनी पर्यावरण याचे ही भान स्वच्छता, प्रदूषण, बोलक्या भाज्या, याविषयी जनजागृती करण्याचा त्यांचा प्रयत्न उत्कृष्ट आहे. झाडांचा आवाज या कवितेतून त्यांनी माणूसकीचा संदेश दिला आहे.

**'झाड म्हणते माणसा**
**घे माझी शिकवण**
**सावली देतो,फळ देतो**
**ठेव माझी आठवण या**
**कवितेतून**

मानवता धर्म हा संस्कार देण्यात आलेला आहे. थोर पुरुष व सुधारक यांचे विचार ही त्यांनी काव्यातून मांडून सांस्कृतिक मूल्ये जपण्याचा सल्ला दिला आहे.

या काव्य संग्रहातील कविता मधून योग, प्राणायाम यांचे जीवनात महत्व सांगण्याचा प्रयत्न ही कवयित्री केला आहे.

या सर्व कविता बाल मुलानी, किशोरवयीन मुलं-मुली यांनी व मोठ्यांनी सुद्धा वाचून त्यातील उपदेश आचरणात आणावे आहेत. संस्कार शिदोरी ही आजच्या बालकांना मिळालेली साहित्यिक गिफ्ट आहे. कवियत्री चो हार्दिक अभिनंदन

पुस्तकाचे नाव -संस्कार शिदोरी, कवयित्री शुभदा चव्हाण, पुस्तक मूल्ये १५०/ - फक्त, प्रकाशक- वर्ड लँड पब्लिकेशन, छत्रपती संभाजीनगर.

**समीक्षक -**
धोंडीरामसिंह राजपूत

# महिलांसाठी खूशखबर! ३ कोटी महिलांना लखपती दीदी बनवणार तर सूक्ष्म कर्जाची सुविधाही उपलब्ध करणार

नवी दिल्ली, दि. २ (वृत्तसंस्था) - मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील शेवटच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 'युवक-महिला-गरीब-शेतकरी' हे सरकारचे प्राधान्य असल्याचे सूचित केले आहे. यातच महिलांसाठी विविध घोषणा करण्यात आल्या आहेत. महत्वाची घोषणा म्हणजे आणखी ३ कोटी महिलांना लखपती दीदी बनवणार असल्याचे सीतारामन यांनी सांगितले.

लखपती दीदी या योजनेतून महिलांचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातात. केंद्र सरकारने हा महत्त्वाचा उपक्रम सुरू केला आहे. ज्यातून महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला जातोय. १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून देशवासीयांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लखपती योजनेचा उल्लेख केला होता. यामध्ये महिलांना आवश्यक आर्थिक ज्ञानासह सर्वसमावेशक आर्थिक साक्षरता कार्यशाळा देखील घेतल्या जातात. यामध्ये अर्थसंकल्प बचत गुंतवणूक आणि आर्थिक साधने याविषयी महिलांना ज्ञान दिले जाते. त्याचबरोबर या योजनेतून सूक्ष्म कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. ज्यातून महिला उद्योग शिक्षण किंवा इतर गरजा पूर्ण करू शकतात. तसेच जास्त स्त्रियांकडे गहाण ठेवण्यासाठी कोणतीही मौल्यवान वस्तू नाही. त्यांच्यासाठी ही कर्ज महत्त्वाची ठरतात. या योजनेअंतर्गत महिलांना तंत्रज्ञानाशी देखील जोडले जाते. कारण या योजनेत महिलांना डिजिटल बँकिंग सेवा, मोबाईल वॉलेट्स आणि इतर डिजिटल प्लॅटफॉर्म चा वापर करून आर्थिक व्यवहार आणि व्यवस्थापन सोयीस्करपणे करण्यास प्रोत्साहन दिले जाते.

आतापर्यंत २ कोटी महिला लखपती बनल्या असून, येणाऱ्या काळात आणखी ३ कोटी महिलांना लखपतीदीदी बनवण्याचे लक्ष्य असल्याचे सीतारामन यांनी सांगितले. नऊ कोटी महिलांचा समावेश असलेल्या ८३ लाख बचत गटांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. यामुळे एक कोटी महिलांना लखपती दीदी बनण्यास मदत झाली आहे.

# डॉ. सचिन बोर्डे यांना पीएच. डी गाईडशिप



छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - महात्मा गांधी कॉलेज ऑफ एज्युकेशन महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक डॉ. सचिन पुंजराम बोर्डे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी संशोधक मार्गदर्शक म्हणून नुकतीच निवड केली आहे. डॉ. बोर्डे हे शिक्षणशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच त्यांचे सामाजिक चळवळीत योगदान आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# कांदा सर्वसामान्यांना पुन्हा रडवणार! बटाटा व इतर भाज्यांच्या किंमतीतही वाढ

मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) - जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतींमुळे सर्वसामान्य माणसाचा तणाव वाढला आहे. महागाईने सामान्य माणसाचे हाल केले आहेत. त्यातच भाज्यांचे दरही वाढल्यामुळे तो पिचला आहे. अशातच बटाटा, कांदा, टोमॅटो अशा प्रमुख भाज्यांचे भाव वाढले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा सर्वसामान्यांना महागाईचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

अलिकडच्या आठवड्यात दररोजच्या जेवणात समावेश असणाऱ्या प्रमुख भाज्यांचे भाव वाढले आहेत, याचाच परिणाम अन्नधान्याच्या महागाई दरावर दिसून येतो. ग्राहक व्यवहार विभागाने जाहीर केलेल्या जानेवारीच्या आकडेवारीनुसार, बटाट्याचा किरकोळ दर वार्षिक आधारावर ३३ टक्क्यांनी वाढला आहे आणि सध्या तो २० रुपये प्रति किलो दराने विकला जात आहे. तर कांद्याच्या किरकोळ भावात २० टक्के वाढ होऊन तो ३० रुपये किलो दराने विकला जात आहे. टोमॅटोच्या दरांत वार्षिक ५० टक्के वाढ झाली आहे, तर किरकोळ बाजारात टोमॅटो ३० रुपये किलोनं विकला जात आहे. पुढील काही महिन्यांत टोमॅटो आणि बटाटा यांसारख्या भाज्यांच्या किमतीत आणखी वाढ होऊ शकते.

**कांद्याच्या वाढत्या किमतींवर रोख लागणार?**

किरकोळ बाजारात कांदा सध्या ३० रुपये किलो दराने विकला जात आहे. गेल्या तीन महिन्यांत त्याच्या किरकोळ किमतींत २५ टक्क्यांची घसरण झाली आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये कांद्याच्या किमतींत ७४ टक्क्यांची वाढ झाली होती, त्यानंतर केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. यासोबतच सरकारने २५ रुपये दराने कांदा विकण्याचा निर्णयही घेतला होता. केंद्र सरकारच्या या प्रयत्नांमुळे नाशिकच्या बाजारातून कांद्याचा भाव आता एक हजार रुपये प्रति क्विंटलवर आला आहे, जो महिन्याच्या सुरुवातीला २ हजार रुपये प्रति क्विंटल होता. टोमॅटो, बटाटा आणि कांद्याचा महागाई दरात ०.६ टक्के, १ टक्के आणि ०.६ टक्के वाटा आहे.

# विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या बैठकीचे ६ फेब्रुवारी रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - विभागीय आयुक्त तथा विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष मधुकरराजे अर्दड यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

शासन यंत्रणेतील भ्रष्टाचाराचे समूळ निर्मुलन करण्यासाठी शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक ०४ फेब्रुवारी, २०११ अन्वये विभागीय स्तरावरील भ्रष्टाचार निर्मुलन समिती स्थापन करण्यात आली आहे. विलंब, गैरव्यवहार, अकार्यक्षमता व इतर कारणाने होणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत जनतेच्या तक्रारी समितीकडून ऐकून घेण्यात येतात तसेच लेखी स्वरूपातील तक्रारी स्विकारण्यात येतात.

विभागीय आयुक्त विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे अध्यक्ष आहेत. पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, विशेष पोलीस महानिरिक्षक, छत्रपती संभाजीनगर, विशेष पोलीस महानिरिक्षक, नांदेड, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, मुख्य वनसंरक्षक वनवृत्त छत्रपती संभाजीनगर, मुख्य अभियंता जलसंपदा विभाग छत्रपती संभाजीनगर, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर, विभागीय कृषि सहसंचालक छत्रपती संभाजीनगर, विभागीय कृषि सहसंचालक लातूर, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर, उपायुक्त (महसूल) तथा सदस्य सचिव, विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती, छत्रपती संभाजीनगर आदी विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे शासकीय सदस्य आहेत.

# ग्रामीण भागातील आरोग्यदूत म्हणून आशा वर्कर्सची आरोग्य सेवा प्रशंसनीय- धोंडीरामसिंह राजपूत



वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) - ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रात कमी मानधनात आशा वर्कर्स ह्या गरोदर माता संगोपन, बाळ पांच वर्षाचे होई पर्यंत त्यांची देखभाल, लसीकरण, किशोरवयीन मुलींच्या समस्याचे समुपदेशन, आयुष्यामान भारत कार्ड मिळवून देणे, माता बाल संगोपन काळजी घेणे अशा आशा वर्कर्स म्हणजे साक्षात आरोग्यरूपी देवदूत आहेत. त्यांची ग्रामीण भागातील आरोग्य सेवा, जनसेवा ही साक्षात ईश्वर सेवा आहे, असे प्रतिपादन जिल्हा आरोग्य देखभाल समितीचे सदस्य तथा माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी येथील पंचायत समिती सभागृहात शुक्रवार (ता.०२) रोजी केले, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत आयोजित 'आशा दिन'निमित्त आयोजित कार्यक्रमात केले,ते पुढे म्हणाले की,आशा वर्कर्स यांची आरोग्य सेवा ही अनमोल आहे,आशा वर्कर्स ह्या ग्रामीण भागातील आरोग्यदूत आहेत,त्यांनी आपली सेवा सामाजिक बांधिलकी म्हणून करावी असेही राजपूत पुढे म्हणाले, कार्यक्रम अध्यक्षस्थानी तालुका आरोग्य अधिकारी डॉ गुरुनाथ इंदूरकर होते,त्यानीं ही आशा वर्कर्स च्या प्रामाणिक सेवेची प्रशंसा केली. याच कार्यक्रमात आशा स्वयंसेविका, तसेच गट प्रवर्तक यांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शन बद्धल त्यांना प्रमाण पत्र व गुलाब पुष्प देऊन त्यांचा गौरव ही करण्यात आला. यानिमित्ताने कार्यालयात रांगोळी स्पर्धा, पथनाट्य, गीत गाणी, गवळण सादर करणाऱ्या आशा वर्कर्सना प्रशस्ती पत्र देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी जयश्री हेगडमल (बागुल), मंगल बडख, अनिता पवार, श्रीमती शिनगारे, श्रीमती देवकर, श्रीमती गायके यांनी गाणी,गवळण सादर केली, व्यासपीठावर तालुका समूह संघटक जोत्सना वाल्मिक भगूरे, एम.टी. सिरसाट, तालुका सिकल सेल सहाय्यक भीमराव इंगळे, उप जिल्हा रुग्णालयचे विजय पाटील, शशिकांत पाटील यांची उपस्थिती होती. सौ. जयश्री बागुल, तालुका आरोग्य सहाय्यीका बबिता शिंदे, प्रभाकर राठोड, शुभम राजपूत, नानासाहेब शेलार, नितीन जाधव, गोकुळ राठोड, संगीता मोरे यांनी सहभाग नोंदविला शेवटी डॉ. इंदूरकर यांनी आभार मानले.

# मनपाचे १९ कर्मचारी सेवनिवृत्त



छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - महानगरपालिकेच्या वर्ग ०३ व ०४ अंतर्गत एकूण १९ कर्मचारी नियत वयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाले आहेत.

महानगरपालिका मुख्यालय येथील प्रशासकीय कार्यालय कक्ष येथे मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते सेरीमोनियाल कॅप,शाल ,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन या सेवानिृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मा. प्रशासकांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मा.अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील,सौरभ जोशी,वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ पारस मंडलेचा,मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे,कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी, सहायक आयुक्त अभय प्रामाणिक,सांस्कृतिक अधिकारी शंभू विश्वासू यांची उपस्थिती होती. या सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये कनिष्ठ अभियंता गोपिकिशन चांडक (उद्यान विभाग) यांचे सह वर्ग ०३ चे जलनिर्देशक धनंजय फडके, मुख्याध्यापिका डॉ. शाहीन अहमद, कनिष्ठ लिपिक शेख मेहबूब शेख हुसेन, चित्रपट चालक शेख मोहम्मद रफीउद्दीन वर्ग ०४ चे माळी मिराबाई साळे, बहुउद्देशीय कामगार संजय कुलकर्णी, वॉचमन शिवाजी लोखंडे, सफाई मजूर मंडाबाई वाघमारे, मलेरिया मजूर राजेश चव्हाण, वॉचमन राम कर्डक, शिपाई शेख अहमद शेख बुढण, वॉचमन सुनील अंभोरे, सफाई मजूर मारुती कांबळे, पद्माबाई जंगले, जनाबाई शिरसाट,स्वीपर मजूर पुनमचंद चावरिया, कोंडवाडा चौकीदार सलीम उद्दीन बशीरोद्दीन, इलेक्ट्रिक पंप ऑपरेटर राजेंद्र काळे या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# हज हाऊसचा लोकार्पण सोहळा

## मराठवाड्याच्या विकासासाठी हज हाऊस सहाय्यभूत-अब्दुल सत्तार

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- मुस्लिम भाविकांची पवित्र हज यात्रा करण्यात 'हज हाऊस', ही एक उत्तम सुविधा आहे. त्यामुळे मराठवाड्याच्या विकासाला हे हज हाऊस सहाय्यभूत ठरेल, असा विश्वास राज्याचे अल्पसंख्याक विकास व पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी आज येथे व्यक्त केला. छत्रपती संभाजी नगर शहरातील हज हाऊसचे लोकार्पण आज श्री. सत्तार यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी खासदार इम्तियाज जलील, आ. हरिभाऊ बागडे, आ.प्रदीप जयस्वाल, आ. उदयसिंह राजपूत, प्रभारी जिल्हाधिकारी डॉ अरविंद लोखंडे यांच्यासह



अल्पसंख्यांक विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

श्री. सत्तार म्हणाले की,हज हाऊस मराठवाड्यातील विविध ठिकाणाहून येणाऱ्या यात्रेकरूंसाठी उत्तम सुविधा आहे.याद्वारे मुस्लिम बांधवांची हज यात्रा सुसह्य आणि जलद होण्यास मदत होईल. तसेच विभागामार्फत आमखास मैदानाचा विकास करून येथे क्रीडा संकुल उभारण्यात येणार,तसेच अल्पसंख्याक विकास आयुक्तालय ही सुरू करण्यात येणार असल्याचेही सत्तार यांनी सांगितले. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यातील हज यात्रेसाठी जाणाऱ्या मुस्लिम बांधवांच्या यात्रेत सहाय्यभूत ठरणारे हज हाऊस हे संभाजीनगरच्या विकासाला साह्यभूत ठरेल असेही सत्तार म्हणाले.

# वेरूळ-अजिंठा महोत्सवाचे शानदार उदघाटन

## पर्यटन विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू-पालकमंत्री संदीपान भुमरे



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- वेरूळ अजिंठा महोत्सव हा जिल्ह्यातील जागतिक वारसा असलेली येथील पर्यटनस्थळे जगातील पर्यटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित केला जातो. रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता असलेल्या पर्यटन उद्योगाच्या विकासासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू,यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असे प्रतिपादन राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांनी आज येथे केले.

वेरूळ अजिंठा महोत्सवाचे शानदार उदघाटन आज सोनेरी महाल परिसरात करण्यात आले. उदघाटन सोहळ्यास अल्पसंख्यांक विकास व पणन मंत्री अब्दुल सत्तार, आ. संजय शिरसाट, विभागीय आयुक्त मधुकर राजे आर्दड, सेवा हमी आयुक्त दिलीप शिंदे,मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास मीना, पोलीस आयुक्त मनोज लोहिया, पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील,पर्यटन विभागाचे उपसंचालक विजय जाधव,पर्यटन सदिच्छादूत नवेली देशमुख, संध्या पुरेचा,सारंग टाकळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री भुमरे म्हणाले की, शासनाने बंद पडलेला हा वेरूळ महोत्सव पुन्हा सुरू केला. या महोत्सवासाठी जो निधी लागेल तो दिला जाईल. जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी निधी मिळावा यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहोत. नुकतेच टूर ऑपरेटर संमेलनातून आपण पर्यटन व्यवसायातील मान्यवरांना एकत्र आणले. शहरातील पर्यटन विकासासाठी जास्तीत जास्त निधी दिला जाईल.

प्रास्ताविक विजय जाधव यांनी केले.त्यात त्यांनी पर्यटनमंत्री गिरीश महाजन,जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी, जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पांडये, यांनी महोत्सवासाठी मदत केल्याचा उल्लेख केला. तसेच महोत्सव यशस्वी करण्यासाठी पालकमंत्री, अधिकारी यांचे सर्व सहकार्य लाभल्याचे सांगितले. नवेली देशमुख, संध्या पुरेचा यांच्या चमूनी यांनी केले.


**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग छत्रपती संभाजीनगर**
**यांचे कार्यालय दुरध्वनी क्रमांक- ०२४०-२३३१२८८**
**ई-मेल westaurangabad.ee@mahapwd.gov.in**
**वेब साईट www.mahawd.gov.in**

**ई-निविदा सुचना क्र.५१ सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन सक्षम वर्गातील कंत्राटदार यांच्याकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. (एकुण २१ कामे)

अ) http://mahapwd.gov.in

ब) https://mahatenders.gov.in

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)

**स्वाक्षरीत/ -**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**

डीजीआयपीआर/२०२३-२०२४/७६२८



## नगर परिषद वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.नपवै/कावी/बांध/२०२४/१९० दिनांक :- ०२/०२/२०२४

**ई-निविदा सूचना क्र.१७-सन २०२३-२४**

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे वस्ती सुधार योजना अंतर्गत Tender ID-2024_DMA_995699_1 या कामांसाठी B1 (Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर यांचेकडून मागविण्यात येत आहे. कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि. ०२/०२/२०२४ पासून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर यांनी राखून ठेवला आहे. सदर निविदा सूचना मध्ये काही बदल होत असल्यास उपरोक्त संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**


## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

(दूरध्वनी क्र.) ०२४०-२३३३५३६-४० (पी.बी.एक्स.)
२३३१२८१, २३३१२८३
फॅक्स नं.०२४०-२३३१२१३

जा.क्र./मनपा/उआ (२)/९३/२०२४ दिनांक :- ०२/०२/२०२४

**वाचा :-** ०१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे नियम-१२८ व परिशिष्ठमधील प्रकरण-८ कराधान नियम
०२. जप्त केलेल्या स्थावर जंगल मालमत्ता विक्रीचे नियम-२०२१

### जप्त केलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठीची जाहीर लिलाव नोटीस

ज्या अर्थी वारंवार सूचित करूनही खालील विवरणामधील मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराची थकीत रक्कम भरलेली नाही. त्याबद्दल त्यांना देयक तसेच वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या परिशिष्ठ-ड मधील प्रकरण-८ कराधान नियम-४२, पोट नियम (१) अंतर्गत कर निर्धारक व संकलक यांनी खालील विवरणाप्रमाणे 'नमुना-ह' मधील अधिपत्र आदेशाप्रमाणे नमूद केलेल्या व्यक्तीची मालमत्ता ही थकीत रकमेच्या वसूलीसाठी जप्त केली आहे.

ज्या अर्थी आता अशा जाहीर प्रगटनाद्वारे नोटीस देण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-१२८, पोटकलम (४) च्या तरतुदीच्या अधिन राहुन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे संबंधित झोन अधिकारी ती मालमत्ता लिलावाने विक्री करणार आहेत. त्याअर्थी नोटीस मध्ये नमूद केल्याप्रमाणे तामील तारखेपासून २१ दिवसात थकीत रक्कम भरणा न केल्यास संबंधित मालमत्ता जाहीर लिलावाद्वारे विक्री केली जाईल. विक्रीसाठी निश्चित केल्या जाणाऱ्या अटी अनुसूचिनुसार असतील. खालील नमूद सर्व संबंधितांना झोन अधिकारी मार्फत उक्त नोटीस बजावण्यात आली असून याद्वारे सर्व संबंधितास जाहीर करण्यात येत आहे. लिलावाची तारीख व वेळ, स्थळ नोटीस मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

**स्वाक्षरीत/ -**
**उप आयुक्त- २**
**छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका**

| अ. क्र. | झोन क्र. | मालमत्ताधारकांचे नांव | पत्ता | मालमत्ता क्र | एकूण थकीत रक्कम | कनिवसं याचे जप्ती बाबत आदेश दि. | फॉर्म नं.4 दिल्याचा क्र व दिनांक | लिलावाची तारीख | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | राजेश बाबुलाल जैस्वाल | H No. 1-10-79 S No. 1167/1 जयसिंगपुरा राज स्टेशनरी छोटी मस्जीद बाजुला छत्रपती संभाजीनगर छत्रपती संभाजीनगर | A0001689 | 79115 | 30.11.2023 | 25.01.2024 | 17.02.2024 | मनपा मुख्य कार्यालय प्रशासकीय ईमारत टप्पा क्र.३ |
| 2 | 1 | किसन शामजी सिरसाठ | जयसिंगपुरा 1-10-53, -, छत्रपती संभाजीनगर | A0001656 | 142266 | 30.11.2023 | 25.01.2024 | 17.02.2024 | ...do... |
| 3 | 1 | दिलावर खॉन अजमल खॉन | जयसिंगपुरा 1-11-28, -, छत्रपती संभाजीनगर | A0001764 | 160160 | 30.11.2023 | 25.01.2024 | 17.02.2024 | ...do... |
| 4 | 1 | श्रीकृष्ण अमरसिंग परदेशी (भारतवाले) मेहताबसिंग जयसिंग परदेशी | खडकेश्वर 5-6-72/P, -, छत्रपती संभाजीनगर | A0016511 | 477794 | 04.12.2023 | 17.01.2024 | 20.02.2024 | ...do... |
| 5 | 1 | शांताराम भीकाजी खरात | नारळीबाग 5-6-70/P, -, छत्रपती संभाजीनगर | A0014512 | 741043 | 04.12.2023 | 17.01.2024 | 20.02.2024 | ...do... |
| 6 | 1 | शमीम वेगम भ्र. शेख जलील | Plot No.21, S.No.2962/1 चा भाग, जिल्हा परिषद निवास जवळ, नुर कॉलनी, नारळी बाग, दर्गा लगत, भ्र.क्र. 9326201798, -, छत्रपती संभाजीनगर | A0031414 | 121528 | 04.12.2023 | 17.01.2024 | 20.02.2024 | ...do... |
| 7 | 1 | ब्रिजलाल चंदनलाल जैस्वाल | H No.4-11-66 सारस्वत बँक शेजारी खडकेश्वर छत्रपती संभाजीनगर छत्रपती संभाजीनगर | A0043360 | 265848 | 04.12.2023 | 17.01.2024 | 20.02.2024 | ...do... |
| 8 | 1 | गिरजरबाई विठोबा जाधव | जुना बाजार 1-18-53, -, छत्रपती संभाजीनगर | A0018142 | 141295 | 04.12.2023 | 17.01.2024 | 20.02.2024 | ...do... |
| 9 | 1 | ईश्वरलाल संभाजी कुचलकुंठे | नारळीबाग 5-6-70/P, -, छत्रपती संभाजीनगर | A0021494 | 308657 | 04.12.2023 | 17.01.2024 | 20.02.2024 | ...do... |
| 10 | 1 | लताबाई गोविंदराव जोशी | जुनाबाजार 5-6-70/P, -, छत्रपती संभाजीनगर | A0003530 | 114147 | 04.12.2023 | 17.01.2024 | 20.02.2024 | ...do... |
| 11 | 1 | सुभाष श्रीरामलाल जैस्वाल | जुनाबाजार 1-16-80/P, -, छत्रपती संभाजीनगर | A0022004 | 107952 | 04.12.2023 | 17.01.2024 | 20.02.2024 | ...do... |
| 12 | झोन क्र.05 | गोकुळ सजन जाधव | जालनारोड | B0050296 | 203953 | 433/20.10.2023 | 1686/16.01.2024 | 06.02.2024 | झोन -05 |
| 13 | झोन क्र.05 | जादीश शाली राम जैस्वाल | सीटीएस-84 जालनारोड | B0053987 | 430759 | 433/20.10.2023 | 1685/16.01.2024 | 06.02.2024 | झोन -05 |
| 14 | झोन क्र.05 | सुखदेव सिंग कुंदनसिंग संगु | गट नं.394/पी हॉटेल मावळा समोर जालनारेड | B0059070 | 127120 | 419/13.12.2023 | 1691/19.01.2024 | 9.02.2024 | झोन -05 |
| 15 | झोन क्र.05 | कुंदनसिंग जग्गु | जालनारोड चिकलठाणा | B0053938 | 528530 | 419/13.12.2023 | 1690/19.01.2024 | 9.02.2024 | झोन -05 |
| 16 | झोन क्र.05 | बाबासाहेब पंडितराव नवपूते | राठी प्लॅनेट चिकलठाणा | B0049907 | 447901 | 433/20.10.2023 | 1701/13.01.2024 | 12.02.2024 | झोन -05 |
| 17 | झोन क्र.05 | शे गुलाम शे रुस्तुम | 736 चिकलठाणा | B0053856 | 418208 | 419/13.12.2023 | 1700/23.01.2024 | 12.02.2024 | झोन -05 |
| 18 | झोन क्र.8 | श्री. अग्रवाल | फ्लॅट नं. के-08, देवानगरी, शहानुरवाडी | आय0011424 | 126275 | 9.11.2023 | 25.01.2024 | 15.02.2024 | झोन -08 |
| 19 | झोन क्र.8 | श्री. त्रिवेदी राजु | फ्लॅट नं. के-14, देवानगरी, शहानुरवाडी | आय0011430 | 126275 | 9.11.2023 | 25.01.2024 | 15.02.2024 | झोन -08 |
| 20 | झोन क्र.8 | श्री. अग्रवाल शामसुंदर | फ्लॅट नं. के-4, देवानगरी, शहानुरवाडी | आय0011420 | 126275 | 9.11.2023 | 25.01.2024 | 15.02.2024 | झोन -08 |
| 21 | झोन क्र.8 | श्री. अग्रवाल विजयकुमार | फ्लॅट नं. के-6, देवानगरी, शहानुरवाडी | आय0011422 | 126275 | 9.11.2023 | 25.01.2024 | 15.02.2024 | झोन -08 |
| 22 | झोन क्र.8 | श्री. मुंढे सुहास प्रभाकर | रो हा नं.26, अथर्व क्लासीक, सातारा | आय0017206 | 134804 | 26.12.2023 | 27.01.2024 | 17.02.2024 | झोन -08 |
| 23 | झोन क्र.8 | श्री. गुप्ता सुरेशचंद्र केशवदेव | रो हा नं.34, अथर्व क्लासीक, सातारा | आय0002063 | 93903 | 26.12.2023 | 27.01.2024 | 17.02.2024 | झोन -08 |
| 24 | झोन क्र.8 | श्री. अमर दिलीपराव जमादार | फ्लॅट नं.बी.ए.102, अथर्व रॉयल सोसायटी, सातारा | आय0031086 | 132599 | 26.12.2023 | 27.01.2024 | 17.02.2024 | झोन -08 |
| 25 | झोन क्र.8 | श्री. परतकर सुनिल बालकीसन | फ्लॅट नं. 25, गट नं. 70/पी, सातारा | आय0002926 | 143693 | 26.12.2023 | 27.01.2024 | 17.02.2024 | झोन -08 |
| 26 | झोन क्र.8 | श्री. परतकर सुनिल बालकीसन | फ्लॅट नं. 26, गट नं. 70/पी, सातारा | आय0002925 | 133218 | 26.12.2023 | 27.01.2024 | 17.02.2024 | झोन -08 |
| 27 | झोन क्र.8 | श्री. मकरंद गोपालराव नंदापुरकर | फ्लॅट नं. सीए-103, अथर्व रॉयल, सातारा | आय0031093 | 147939 | 26.12.2023 | 27.01.2024 | 17.02.2024 | झोन -08 |
| 28 | झोन क्र.8 | श्री. विशाल कन्हैयालाल डेबरा | फ्लॅट नं. सीए-402, अथर्व रॉयल, सातारा | आय0031087 | 147939 | 26.12.2023 | 27.01.2024 | 17.02.2024 | झोन -08 |
| 29 | झोन क्र.8 | श्री. अभिजीत गोविंदराव काळे | फ्लॅट नं. बी/अ-202 अथर्व रॉयल, सातारा | आय0011380 | 150130 | 26.12.2023 | 27.01.2024 | 17.02.2024 | झोन -08 |
| 30 | झोन क्र.8 | श्री. अभिजीत गोविंदराव काळे | फ्लॅट नं. बी/अ-401 अथर्व रॉयल, सातारा | आय00011378 | 122959 | 26.12.2023 | 27.01.2024 | 17.02.2024 | झोन -08 |
| 31 | झोन क्र.8 | श्रीमती. सारीका रमेश भंडारी | फ्लॅट नं. 403, कासलीवाल मार्वल सातारा | आय0010680 | 147028 | 26.12.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 32 | झोन क्र.8 | श्री. कोतीमल ईजरानी | फ्लॅट नं. 202, कासलीवाल मार्वल सातारा | आय0010671 | 148265 | 26.12.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 33 | झोन क्र.8 | श्री. शांतीलाल रामदास पवार | प्लॉट नं.35, गट नं.103, श्रीकृष्ण नगर, देवळाई | आय0038787 | 496329 | 20.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 34 | झोन क्र.8 | श्रीमती मंगलबाई शिवकुमार झेरीकुंटे | प्लॉट नं. 10, गट नं.94, अंजलीनगर, देवळाई परिसर | आय0037271 | 158752 | 20.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 35 | झोन क्र.8 | श्रीमती सिमा बिरारे व पुंजबा बिरारे | रो हा नं. 11,12, गट नं.90, श्रीनिवास नगर, देवळाई | आय0030337 | 205453 | 20.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 36 | झोन क्र.8 | श्रीमती शैलेश अशोक तळवदे | रो हा नं. 19/20, गट नं.90, श्रीनिवास नगर, देवळाई | आय0030334 | 222078 | 20.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 37 | झोन क्र.8 | श्री. ज्ञानेश्वर रामराव पवार | प्लॉट नं. 17, गट नं.96, त्रिमुर्ती नगर, देवळाई परिसर | आय0038453 | 123011 | 9.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 38 | झोन क्र.8 | श्री. स्वप्नील शिसराव खंडागळे | रो हा नं. 39, गट नं.83, विनायक नगर देवळाई | आय0017057 | 222226 | 20.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 39 | झोन क्र.8 | श्री. अनुराग कन्स्ट्रक्शन तर्फे - अनिल रामगोपाल लाहोटी | फ्लॅट नं.05, गट नं. 137, रामकमल अपार्टमेंट, विजयंत नगर, सातारा | आय0022702 | 168029 | 9.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 40 | झोन क्र.8 | श्री. अनुराग कन्स्ट्रक्शन तर्फे अनिल रामगोपाल लाहोटी | फ्लॅट नं.02, गट नं. 137, रामकमल अपार्टमेंट, विजयंत नगर, सातारा | आय0022700 | 157442 | 9.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 41 | झोन क्र.8 | श्री. विश्वनाथ सुर्यभान सुरासे | प्लॉट नं.02, गट नं.138/142, आलोक नगर, सातारा | आय0019945 | 125092 | 9.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 42 | झोन क्र.8 | श्री. टी. एच | शॉप नं. 04, गट नं. 136, वास्तुशिल्प अपार्टमेंट, विजयंत नगर, सातारा | आय0036227 | 128248 | 20.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 43 | झोन क्र.8 | श्री. टी. एच | शॉप न 02, अडियो त्रिशुल, मंजित प्राईड, सातारा | आय0038185 | 170740 | 20.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 44 | झोन क्र.8 | श्री. विष्णु गोविंद वाडेकर | प्लॉट नं. 86, गट नं. 138, छत्रपती नगर, सातारा | आय0025823 | 140860 | 20.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 45 | झोन क्र.8 | श्री. रमेश सोनवणे | प्लॉट नं.40, मुस्तफाबाद | आय0035034 | 228147 | 9.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 46 | झोन क्र.8 | श्री. जबिंदा अर्जुनकौर | फ्लॅट नं. बी-9, देवानगरी, शहानुरवाडी | आय0011410 | 126275 | 9.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 47 | झोन क्र.8 | श्री. जबिंदा अर्जुनकौर | फ्लॅट नं. के17, देवानगरी, शहानुरवाडी | आय0011432 | 126275 | 9.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 48 | झोन क्र.8 | श्री. जबिंदा अर्जुनकौर | रो हा नं. 01 देवानगरी, शहानुरवाडी | आय0011396 | 157385 | 9.11.2023 | 29.01.2024 | 20.02.2024 | झोन -08 |
| 49 | झोन क्र.8 | श्री. रोशन अल्ताफ खान | रो हा नं-ए-2, अथर्व क्लासिक बिड बायपास सातारा | आय0002048 | 181742 | 9.11.2023 | 30.01.2024 | 21.02.2024 | झोन -08 |
| 50 | झोन क्र.8 | श्री. हाडके प्रविण मनोहर व हाडके आश्विनी | रो हा नं-ए-5, अथर्व क्लासिक बिड बायपास सातारा | आय0002050 | 143903 | 9.11.2023 | 30.01.2024 | 21.02.2024 | झोन -08 |
| 51 | झोन क्र.8 | श्री. अभिजीत पवार | गट नं.71, कासलीवाल मार्वल शेजारी, बिड बायपास, सातारा | आय0012874 | 298593 | 9.11.2023 | 30.01.2024 | 21.02.2024 | झोन -08 |
| 52 | झोन क्र.8 | श्री. गोवर्धन शामराव पवार | एजीपी पब्लिक शाळेसमोर, मुस्तफाबाद | आय0041296 | 786712 | 9.11.2023 | 30.01.2024 | 21.02.2024 | झोन -08 |
| 53 | झोन क्र.8 | श्री. दशरथ गोविंदराव सुर्यवंशी | रो हा नं.97, कासलीवाल मार्वल, बिड बायपास सातार परिसर | आय0011815 | 184193 | 9.11.2023 | 30.01.2024 | 21.02.2024 | झोन -08 |
| 54 | झोन क्र.8 | श्री. आकाश गोवर्धन पवा | गट नं.71, कासलीवाल मार्वल शेजारी, बिड बायपास, सातारा | आय0012873 | 298595 | 9.11.2023 | 30.01.2024 | 21.02.2024 | झोन -08 |

**स्वाक्षरीत/ -**
**उप आयुक्त- २**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**